201601051153439507

~~निनावी~~ जिनावी व खोट्या सहीने शासनाकडे आलेल्या अर्जावरील कार्यवाही -

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक- शाकप-1085/58/18 (र. व का.)
मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 7 मे, 1985.

परिपत्रक

निनावी व खोट्या सहीने पाठविलेल्या अर्जाची विल्लेवाट लावण्याचे आदेश "शासनास करावयाचे अर्ज, तयार करणे, सादर करणे व त्यांची विल्हेवाट लावणे यासंबंधी शासनाचे सुधारलेले नियम (आवृत्ती 1983)" या पुस्तिकेतील नियम 3-अ आणि 3-ब अन्वये दिलेले आहेत. हे नियम खालीलप्रमाणे आहेत :-

3 (अ) प्रत्येक अर्जावर अर्जदाराने (जर तो संयुक्त अर्ज असेल तर अर्जदारांनी), अर्जाच्या खरेपणाबद्दल सही केली पाहिजे. अर्जदारास जर सही करता येत नसेल तर त्याने अर्जाच्या खरेपणाबद्दल आंगठ्याच्या ठसा उमटवला पाहिजे (संयुक्त अर्ज असल्यास, अर्जदारांनी आंगठ्याचे ठसे, उमटवले पाहिजेत). ज्यावेळी निनावी अर्जात पडताळणी करण्यास समर्थ असलेल्या विशिष्ट प्रसंगाचा उल्लेख केलेला असेल आणि ते अन्वेषण करावयासाठी सार्वजनिकदृष्ट्या पुरेसे महत्त्वाचे असतील त्यावेळी असे निनावी अर्ज वगळून इतर निनावी अर्जाचा कोणत्याही प्रकारे विचार करण्यात येणार नाही आणि ते दप्तरदाखल करण्यात येतील.

3 (ब) जेव्हा सही केलेला अर्ज, हा खोट्या सहीने केलेला अर्ज असहे असे सिध्द होईल तेव्हा तो निनावी अर्जाप्रमाणेच निकालात काढण्यात येईल.

2. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, निनावी व खोट्या सहीने अर्ज झाले तरीही चौकशी सुरू करण्यात येते. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी वर्गामध्ये पुष्कळ निष्ठाहीनता ( demoralisation ) होते. या विषयाबद्दल असा खुलासा करण्यात येत आहे की, निनावी व खोट्या सहीने केलेल्या अर्जावर चौकशीचे आदेश देण्यापूर्वी वरिष्ठ अधिका-यांनी अर्जाचा विचार करुन आदेश दिले पाहिजेत. या आदेशांमध्ये चौकशी करण्याचे कारण स्पष्टपणे दर्शविले पाहिजे. मंत्रालयामध्ये असे आदेश सह सचिव किंवा त्यांचेवरील वरिष्ठ अधिकारी यांनी, व इतरत्र विभाग प्रमुख किंवा कार्यालय प्रमुख यांनीच निर्गमित केले पाहिजेत.

सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते आहे की, वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

सही/-
(बी. बी. शर्मा)
सचिव (पु. सु. व र. व का.)

---